सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २७ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# महापालिकेनंतर आता जिल्हा परिषदेचा धुराळा!

## उद्यापासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उतरणार मैदानात

## ७ दिवसात घेणार २२ सभा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ मुंबई–** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा धुराळा शांत झाल्यानंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली असून संपूर्ण राज्यात राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. सर्वच प्रमुख पक्षांचे दिग्गज नेते प्रचाराच्या मैदानात उतरले असतानाच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देखील आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत प्रचारासाठी सक्रिय होणार आहेत. फडणवीस यांच्या प्रचार दौऱ्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला असून आगामी काळात या निवडणुकांमध्ये मोठी चुरस पाहायला मिळणार आहे.

महानगरपालिका निवडणुकीतील यशानंतर आता जिल्हा परिषदांवरही भाजपचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी कंबर कसली असून, २८ जानेवारी ते ३ फेब्रुवारी या सात दिवसांच्या काळात ते राज्याचा झंझावाती दौरा करणार आहेत. या मोहिमेत फडणवीस १२ जिल्ह्यांमध्ये एकूण २२ जाहीर सभा घेणार असून, दौऱ्याची सुरुवात २८ जानेवारीला रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या कोकणातील जिल्ह्यांतून होणार आहे. पक्षाची ताकद ग्रामीण भागात तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी स्वतः फडणवीस मैदानात उतरल्याने




भाजपच्या स्थानिक नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना मोठे बळ मिळाले असून, आगामी निवडणुकीत सर्व जिल्हा परिषदा काबीज करण्यासाठी भाजपने आपली संपूर्ण प्रतिष्ठा पणाला लावल्याचे स्पष्ट होत आहे.

राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचा धुराळा शांत होत असतानाच आता आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी राजकीय वातावरण तापण्यास सुरुवात झाली आहे. सध्या राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित असून, अनेक ठिकाणी प्रशासकांचा कारभार सुरू आहे. मात्र, ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशाचा परिणाम या निवडणुकीवर झाला आहे. त्यामुळे आता सरसकट सर्वच नव्हे, तर केवळ १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठीच प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, या जागांसाठी ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार असून, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी पार पडेल. या निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ ची मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार असून, १३ जानेवारीपासूनच आचारसंहिता लागू झाली आहे. महानगरपालिकांनंतर आता ग्रामीण भागातील ही मिनी विधानसभा काबीज करण्यासाठी सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी आपले आराखडे तयार करण्यास सुरुवात केल्याने या रणधुमाळीत मोठी चुरस पाहायला मिळणार आहे.

# ठाकरे गटाचे नेते फडणवीसांच्या पाठिशी उभे ठाकले

## अमृता फडणवीसांबाबत अंजली भारतींच्या आक्षेपार्ह वक्तव्यावर तुटून पडले!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७मुंबई–** गायिका अंजली भारती यांनी भंडाऱ्यातील एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्याविषयी वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर भाजप आणि शिंदे सेनेचे नेते आक्रमक झाले होते. अशातच आता उद्धव ठाकरे यांची शिवसेनाही अमृता फडणवीस यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली आहे. ठाकरे गटाच्या किशोरी पेडणेकर, अंबादास दानवे, संजय राऊत या सर्व नेत्यांनी अमृता फडणवीस यांच्याविषयीचे वक्तव्य अयोग्य असल्याचे सांगत या प्रकाराच निषेध केला. सन्माननीय




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्याबद्दल गायिका अंजली भारती यांनी जे वक्तव्य केले आहे, त्याचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या महिला आघाडीकून निषेध करत असल्याचे ट्विट ठाकरे गटाच्या मुंबई महानगरपालिकेतील गटनेत्या किशोरी पेडणेकर यांनी केले. संजय राऊत आणि अंबादास दानवे यांनीही अमृता फडणवीस यांच्याविषयीचे वक्तव्य योग्य नसल्याचे म्हटले. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप ८९ जागा जिंकत सर्वाधिक मोठा पक्ष ठरला होता. मात्र, बहुमतासाठी काही जागा कमी पडत असताना एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने दबावतंत्राचे राजकारण सुरु केल्याने देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्यात पडद्यामागे चर्चा सुरु असल्याची कुजबुज राजकीय वर्तुळात सुरु आहे. मुंबईच्या महापौरपदाच्या निवडणुकीत ठाकरे गटाकडून भाजपला अनुकूल भूमिका घेतली जाईल, अशीही चर्चा होती. त्यामुळे उद्धव ठाकरे हे पुन्हा भाजपच्या जवळ गेल्याची चर्चा रंगली होती. अशातच अमृता फडणवीसांच्या या प्रकरणात ठाकरे गट फडणवीसांच्या पाठी ठामपणे उभे राहिल्याने राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

# माथेफिरूने ट्यूशनला जाणाऱ्या २ मुलींना विहिरीत फेकले

## जळगाव जिल्ह्यातील भयंकर घटना



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७जळगाव**

एका माथेफिरू तरुणाने खासगी शिकवणीला जाणाऱ्या २ अल्पवयीन विद्यार्थिनींना विहिरीत फेकून दिल्याची भयंकर घटना जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यात घडली आहे. सदर तरुणाने या मुलींना विहिरीत का फेकले? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण पोलिसांनी आरोपी तरुणाला ताब्यात घेतले आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, भुसावळ तालुक्यातील साकरी गावात ही घटना घडली आहे. रोहन चौधरी असे आरोपी माथेफिरू तरुणाचे नाव आहे. पीडित मुली इयत्ता ९ वीच्या विद्यार्थिनी आहेत. त्या मंगळवारी सकाळी नेहमीप्रमाणे गावातून खासगी शिकवणीसाठी जात होत्या. त्या गावाजवळील एका शेतालगत पोहोचल्या असता तिथे दबा धरून बसलेल्या आरोपीने या दोघींवर हल्ला केला. त्याने त्यांना पकडून एका विहिरीजवळ नेले. त्यानंतर त्यांना पकडून विहिरीत फेकून दिले. हा प्रकार घडत असताना मुलींनी जिवाच्या आकांताने आरडाओरडा केला.

त्यांचा आरडाओरडा ऐकूण दुसऱ्या एका शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांचे लक्ष त्यांच्याकडे गेले. त्यानी हातातील काम सोडून त्यांच्या दिशेने धाव घेतली. त्यांनी गावातही ही गोष्ट कळवली. त्यानंतर गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तत्काळ मुलींना दोरखंड व शिडीच्या मदतीने विहिरीबाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू केला.

# चंद्रपुरात ठाकरे गट काँग्रेसला मदत करणार,

## पण महापौर पदासाठी अडीच वर्षांची ठेवली अट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७चंद्रपूर–** काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी चंद्रपूर महापालिकेत सत्ता स्थापन करण्याच्या मुद्यावर ठाकरेंशी चर्चा केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना वडेट्टीवारांनी ही चर्चा अत्यंत सकारात्मक झाल्याचे सांगितल्यामुळे चंद्रपुरात सत्ता स्थापन करण्याचा तिढा जवळपास सुटल्याचे मानले जात आहे.

चंद्रपूर महापालिका निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. त्यामुळे येते सत्ता स्थापनेचा मोठा पेच निर्माण झाला आहे. भाजप व काँग्रेस या दोन्ही बड्या पक्षांनी इतर पक्षांना सोबत



घेऊन सत्ता स्थापन करण्याचे प्रयत्न सुरू केलेत. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रयत्नांतर्गत मंगळवारी ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी चंद्रपूर महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी ठाकरे गटाची मदत मागितली. त्यावर ठाकरेंनी महापौर पद व स्थायी समितीचे अध्यक्षपद प्रत्येकी अडीच वर्ष वाटून घेण्याच्या अटीवर काँग्रेसला पाठिंबा देण्याचे स्पष्ट केले.उद्धव ठाकरेंनी महापौर कुणाचा असावा? यासंबंधीही एक अट ठेवली आहे. महापौर ठरवताना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख संदीप गिडे यांच्याशी चर्चा करून समन्वयाने एक नाव निवडावे असे त्यांनी सूचवले. त्यांची ही भूमिकाही आम्हाला मान्य आहे.

शेवटी महापौर पदावर बसणाऱ्या व्यक्तीने सर्वांना सोबत घेऊन वाटचाल करणे गरजेचे असते. आम्ही त्यांच्यापुढे पहिली अडीच वर्षे काँग्रेसला संधी देण्याची विनंती केली. त्यावर ते त्यांच्या जिल्हाप्रमुखांशी संवाद साधून आपला निर्णय कळवणार आहेत. आम्हीही या प्रकरणी आमच्या वरिष्ठांशी चर्चा करून पुढील निर्णय घेऊ, असे ते म्हणाले.

# आता ZP निवडणुकीनंतर शिवसेना खटल्याची सुनावणी

## सुप्रीम कोर्टाने १८ फेब्रुवारीची तारीख केली निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७मुंबई–** महाराष्ट्रासह अवघ्या देशाचे लक्ष लागलेल्या शिवसेना पक्ष व धनुष्यबाण प्रकरणाच्या सुनावणीसाठी आता सर्वोच्च न्यायालयाने आता १८ फेब्रुवारी ही नवी तारीख दिली आहे. त्यामुळे आता या प्रकरणावर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीनंतरच सुनावणी होईल हे स्पष्ट झाले आहे.

सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वातील खंडपीठाने शिवसेनेची सुनावणी २१ व २२ जानेवारी रोजी सलग २ दिवस घेण्याचे निश्चित केले होते. पण २१ तारखेला सुप्रीम कोर्टाने ऐनवेळी अरावली पर्वताचे प्रकरण हातावर घेतल्यामुळे या प्रकरणी सुनावणी होऊ शकली नाही.

त्या दिवशी या प्रकरणाची सुनावणी २३ जानेवारी रोजी होईल असे सांगण्यात येत होते. पण त्या दिवशीही हे प्रकरण बोर्डावर आले नाही. अखेर आज सुप्रीम कोर्टाने हे प्रकरण १८ फेब्रुवारी रोजी सुनावणीसाठी हाती घेतले जाईल हे स्पष्ट केले




आहे. सुप्रीम कोर्टाच्या संकेतस्थळावर ही तारीख नमूद करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. त्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने या प्रकरणाची सुनावणी ही निवडणूक प्रक्रिया पूर्ण होण्याअगोदर घेण्याची मागणी केली होती. पण कोर्टाने त्याकडे दुर्लक्ष करत ही सुनावणी या निवडणुकांचा निकाल घोषित झाल्यानंतर जवळपास १० दिवसांनी घेण्याचे निश्चित केले आहे.

# ७८ हजार हेक्टर जंगल माणूस गिळतोय


## सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातून धक्कादायक माहिती समोर

**दि.२७मुंबई,**

पुण्यासारख्या मोठ्या शहरांपेक्षा मोठ्या आकाराचे वनक्षेत्र अतिक्रमणाच्या विळख्यात अडकल्याची माहिती शासनाने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातून पुढे आली आहे. ७८ हजार हेक्टर जंगल माणूस गिळतोय, प्राणी जाणार कुठे? असा सवाल यातून उपस्थित होत आहे.

राज्यातील वनक्षेत्रावर वाढणारे अतिक्रमण यावर मध्यंतरी पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा समोर आला होता. ठाणे, अमरावती, नंदुरबार, धुळे, पालघर, नवी मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, यवतमाळ, नागपूर, बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये वनक्षेत्रावर वेगवेगळ्या प्रकारचे अतिक्रमण झालेले आहे. ठाणे, अमरावती, पालघर, नंदुरबार, नवी मुंबई येथे तर वनक्षेत्रावर मोठमोठ्या इमारती उभ्या झालेल्या असताना वनविभाग असे अतिक्रमण काढण्यास अपयशी ठरले आहे.

सन १९८० पूर्वी तसेच नंतर वनजमिनीवर करण्यात आलेल्या विविध प्रकारचे अतिक्रमण किती याचे वर्गीकरण करण्याची सूचना वनविभागाने केली आहे. याचा



पूर्वापार ऐतिहासिक भारतीय पुरातत्त्व खात्याच्या यादीमध्ये अशा अतिक्रमणाचा समावेश आहे काय, असल्यास त्याचा पुरावा, याशिवाय अशा अतिक्रमणाबाबत वनाधिकाऱ्यांनी केलेली कारवाई असे वर्गीकरण करून माहिती अद्ययावत करण्यात येणार आहे. असे असले तरी, १९८० पूर्वी मोठ्या प्रमाणात झालेले वनजमिनीवरील अतिक्रमण वनविभागाने 'जैसे थे' ठेवले आहे.

राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील असलेल्या वनजमिनी वर असलेल्या अतिक्रमणा ची माहिती वनविभागा कडे अद्ययावत नाही. याबाबत नागपूर येथील प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय अनभिज्ञ आहे. वनजमिनीचे वनहक्क कायद्यातंर्गत पट्टे वाटप झाल्याबाबतची माहिती २२ मे २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने मागितली असता ती अद्यापही दिलेली नाही.

# 'सातारा गॅझेटियर' लवकरच लागू होणार

## मराठा आरक्षणाबाबत सरकारचा मोठा निर्णय, मंत्रालयातील बैठकीत आरक्षणाचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७मुंबई**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर काही महिन्यांपूर्वी मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मोठ्या प्रमाणात आंदोलन केले होते. याचा परिणाम म्हणून आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा शासन निर्णय घेण्यात आला. त्यानंतर मराठवाड्यातील अनेक मराठा बांधवांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ मिळण्यास सुरुवात झाली. उपोषण सुरू असताना हैदराबादसह सातारा गॅझेट देखील लागू करण्याचे मान्य करण्यात आले होते. परंतु, अद्याप सातारा गॅझेट लागू झाले नसल्याने मराठा समाजात संभ्रम निर्माण झाला होता. याच संदर्भात मंत्रालयात पार पडलेल्या मराठा आरक्षण उपसमितीच्या बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला आहे.

उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात आजच्या बैठकीत सातारा गॅझेटियरवर प्रामुख्याने चर्चा झाली आहे. तसेच हैदराबाद गॅझेटियर अंमलबजावणी आणि मराठा आरक्षण विषयावर आढावा घेण्यात आला. त्यानुसार, राज्यातील जिल्हा परिषद निवडणुकीनंतर सातारा गॅझेटियर लागू करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमुळे सातारा गॅझेट लागू करण्यास अडचणी येत असल्याचे म्हटले



जात आहे.

आजच्या झालेल्या बैठकीनंतर, फक्त इंटरप्रिटेशनचा भाग असल्याने या संदर्भात देखील लवकरच निर्णय होणार असून समज-गैरसमज दूर करत मराठा आरक्षणासंदर्भात सातारा गॅझेट लागू करण्यासंदर्भात हालचाली सुरू झाल्या असल्याचे समजते. दरम्यान, गेल्या काही महिन्यांपासून राज्यात निवडणुकीचे वातावरण आहे. सुरुवातीला नगरपालिका, मग महापालिका आणि आता जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका सुरू आहेत. त्यामुळे गेल्या काही महिन्यात राज्याच्या अनेक भागांमध्ये आचारसंहिता लागू असल्याने राज्य सरकारला मोठे निर्णय घेता आले नसल्याचे समजते.

आता जिल्हा परिषदेच्या तसेच पंचायत समितीच्या निवडणुका झाल्यानंतर सातारा गॅझेटियर लागू केले जाणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे मराठा समाजाला आणखी मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच मनोज जरांगे पाटील यांनी केलेली मागणी देखील या निमित्ताने पूर्ण होणार असल्याचे दिसते.

## संपादकीय ......

# अंधारा कालखंड उजळवणारा

शीख परंपरेतील ‘एक ओंकार’!भारतीय इतिहासात अशी काही महान व्यक्तिमत्त्वे उदयास आली आहेत की, ज्यांचे जीवन समाजासाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरते. अशा महान विभुतींचे कार्य एखाद्या धर्माच्या चौकटीत न अडकता संपूर्ण मानवजातीसाठी अखंड प्रेरणेचा स्रोत ठरते. शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेगबहादूर जी, हे असेच एक महान व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सत्य, न्याय, करुणा, धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी अर्पण केले. त्यांच्या बलिदानाला ३५० वर्षे पूर्ण होत असताना, त्यांचे सामाजिक सुधारक म्हणून कार्य आणि विचार आजही तितकेच सुसंगत आणि मार्गदर्शक आहेत.

१ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे जन्मलेले गुरु तेगबहादूर जी हे सहावे शीख गुरु श्री गुरु हरगोबिंद साहेब यांचे तेजस्वी पुत्र. बालपणापासूनच त्यांच्या जीवनावर अध्यात्म, शौर्य आणि सेवाभावाचे संस्कार कोरले गेले. वेद – उपनिषदे, इस्लामी तसेच भारतीय तत्त्वज्ञानाच्या सखोल चिंतनातून त्यांच्या विचारांना सर्वधर्मसमभाव आणि उदात्त मानवतावादाची झळाळी प्राप्त झाली. गुरु तेगबहादूर जी केवळ आध्यात्मिक गुरु नव्हते, तर ते एक प्रभावी सामाजिक सुधारक होते. त्या काळात भारतीय समाज जातीय भेदभाव, धार्मिक अत्याचार, अंधश्रद्धा आणि राजकीय दडपशाहीने ग्रासलेला होता. अशा परिस्थितीत त्यांनी समाजाला सत्य, समानता आणि नैतिकतेचा मार्ग दाखवला.

भारतीय इतिहासात मुघल सम्राट औरंगजेब आणि गुरु तेगबहादूर जी, ही दोन व्यक्तिमत्त्वे परस्परविरोधी विचारधारांचे प्रतीक म्हणून समोर येतात. सत्ता, कट्टरता आणि धर्मांतराची सक्ती यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या औरंगजेबाने धर्म–युध्द पुकारले, तेव्हा गुरु तेगबहादूर जी यांनी औरंगजेबाच्या अन्यायी धोरणांना उघड आव्हान दिले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, धर्मस्वातंत्र्यावर गदा आणणे हे अधर्माचे लक्षण आहे. या संघर्षात त्यांनी स्वतःच्या प्राणाची आहुती देण्याचा मार्ग स्वीकारला. १६७५ साली दिल्लीच्या चांदणी चौकात गुरु तेगबहादूर जी यांनी दिलेले बलिदान कोणत्याही राजकीय सत्तेविरुद्ध नव्हते, तर विचार आणि धार्मिक स्वातंत्र्यासाठी होते. गुरु तेगबहादूर जी मानवतेचे अमर नायक बनले. म्हणूनच त्यांना ‘हिंद दी चादर’ असे गौरवाने संबोधले जाते.त्यांचे पुत्र श्री गुरु गोबिंदसिंग जी यांनी पुढे खालसा पंथाची स्थापना करून अन्यायाविरुद्ध संघटित लढ्याचा मार्ग दाखवला. आज आपण मानवाधिकारांची चर्चा करतो. पण, गुरु तेगबहादूर जी यांनी १७व्या शतकातच मानवी हक्कांचा पुरस्कार केला. धर्म मानण्याचा अधिकार, विचार करण्याचे स्वातंत्र्य आणि आत्मसन्मानाने जगण्याचा अधिकार हे मूलभूत मानवी हक्क आहेत, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले. त्या काळात अस्पृश्यता, भेदभाव आणि अन्याय हे भारतीय समाजजीवनाचे वास्तव होते. अशा विषम आणि अन्यायी सामाजिक रचनेत मानवी समानतेचा विचार मांडणे हे क्रांतिकारक धैर्याचे लक्षण होते. याच अंधाऱ्या काळात गुरु तेगबहादूर जी यांनी शीख परंपरेतील ‘एक ओंकार’ या तत्त्वाचा आशय समाजजीवनात उतरवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या दृष्टीने ईश्वर एकच असून, त्याची निर्मिती असलेला प्रत्येक मानव समान आहे. जात, धर्म, वर्ण किंवा पंथ यांवर आधारित श्रेष्ठ–कनिष्ठतेला त्यांनी स्पष्टपणे नकार दिला. जातीभेदाच्या जखमांवर करुणेचा लेप लावला आणि समाजाला समतेचा मार्ग दाखवला. गुरु तेगबहादूर जी यांच्या बाणीत आत्मचिंतनाला विशेष महत्त्व आहे. मनुष्याने प्रथम स्वतःच्या अंतःकरणाचा शोध घ्यावा, इच्छांचे बंधन ओळखावे आणि विवेकाच्या प्रकाशात जीवन जगावे, असा त्यांचा आग्रह होता. त्यांच्या मते ईश्वरभक्ती ही केवळ शब्दांत, वेशात किंवा विधींमध्ये व्यक्त होत नाही; ती माणसाच्या आचरणात, व्यवहारात आणि सेवाभावात प्रतिबिंबित झाली पाहिजे. समकालीन वास्तवात गुरु तेगबहादूर जी यांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. धार्मिक सहिष्णुता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सामाजिक समता आणि मानवतेचा सन्मान ही मूल्ये आजही अमूल्य आहेत. सदैव राहतील. गुरु तेगबहादूर जी यांच्या ३५०व्या बलिदान दिनानिमित्त त्यांच्या सामाजिक सुधारणा, मानवतावादी विचारांचे स्मरण करणे, ही काळाची गरज आहे.

# मल्चिंग पेपरवर कांदा लागवडीसाठी एकरी किती खर्च येतो, किती उत्पादन मिळते? वाचा सविस्तर




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक**

जिल्ह्यात कांदा पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. शेतकरी कांदा लागवडीसाठी विविध प्रयोगाचा अवलंब करत आहेत. मजुरांची टंचाई लक्षात घेता शेतकऱ्यांनी यंत्राच्या सहाय्याने कांदा लागवडीवर भर दिला आहे. टोमॅटो, काकडी, मिरची, टरबूज, खरबूज, वांगी यासाठी मल्चिंग पेपर अंथरून लागवड केली आहे.

आता शेतकऱ्यांनी एक पाऊल पुढे टाकत कांदा पीक मल्चिंग पेपरवर घेणे सुरू केले आहे. येवला तालुक्यातील पिंपळगाव जलाल येथील शेतकरी बापूसाहेब नरोडे यांनी तीन एकर क्षेत्रावर मल्चिंग पेपर अंथरून कांदा लागवड केली आहे. तीन एकर क्षेत्राची मशागत करून त्यावर खते टाकून मल्चिंग पेपर अंथरला आहे.

विशेष म्हणजे एक एकरमध्ये तीन लाख आठ हजार कांदा रोपे लावली आहेत. कांदा उत्पादक पट्ट्यात गेल्या काही वर्षात लागवड पद्धतीत बदल होत आहे. जिल्ह्यात अलीकडे मल्चिंग पेपरवर लागवड होत आहे. ही पद्धत उत्पादन वाढ, पाण्याची बचत, मजूर टंचाईसाठी प्रभावी आहेत.

**एकरी खर्च असा**

रासायनिक खते एकरी १५ हजार रु.

मल्चिंग पेपर एकरी १० हजार रु.

**साधे ठिबक सिंचन १० हजार रु.** – गेल्या अनेक वर्षांपासून ठिबक सिंचनावर कांदा लागवड घेत होतो. मल्चिंग पेपरवर कांदा लागवड करण्याचा निर्णय घेतला. मल्चिंग पेपरवर ४ बाय ४ इंच अंतर असून, आडव्या ओळीत १० रोपे लागतात. एकरी एकरी तीन लाखांवर रोपांची लागवड झाली आहे यामध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहेत.

**– बापूसाहेब नरोडे, शेतकरी, पिंपळगाव**

# ‘या’ लोकांनी घेऊ नये हळदीचे दूध; आरोग्यासाठी ठरेल घातक



**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक**

हळदीचे दूध आरोग्यासाठी अत्यंत गुणकारी मानले जाते. दररोज हळदीचे दूध घेतल्याने रोगप्रतिकारकशक्ती वाढते. तसेच सांधेदुखी कमी होते आणि जळजळ कमी होते. फूड्स जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या २०१७ च्या अहवालानुसार, हळदीमध्ये असलेल्या कर्क्यूमिनमध्ये अँटीऑक्सिडंट आणि दाहक–विरोधी गुणधर्म आहेत. हळदीच्या दुधाचे आरोग्याला इतके फायदे होत असले तरी काही लोकांच्या आरोग्यासाठी ते घातक ठरू शकते.




हळदीमुळे शरीरात पित्त निर्मितीची प्रक्रिया वेगवान होते. जर एखाद्याला पित्ताच्या समस्या असतील तर हळदीचे दूध पिल्याने त्रास वाढतो आणि अस्वस्थ वाटते. त्यामुळे पित्ताचा त्रास असलेल्यांनी हळदीचे दूध घेताना डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

हळद रक्तातील साखर कमी करण्यास मदत करते. मात्र, जर तुम्ही आधीच मधुमेहाची औषधे घेत असाल, तर हळदीचे दूध साखरेची पातळी गरजेपेक्षा जास्त कमी करू शकते. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांनी प्रमाणात हळदीचे दूध घ्यावे.

हळदीमुळे शरीरातील लोहाचे शोषण कमी होऊ शकते. शरीरात हिमोग्लोबिन कमी असलेल्या लोकांसाठी दररोज हळदीचे दूध घेणे हानिकारक असू शकते. जर तुम्हाला निमिया किंवा लोहाची कमतरता असेल, तर हळदीचे अतिसेवन टाळावे.हळद रक्त पातळ करण्याचे काम करते. जर तुमची कोणतीही शस्त्रक्रिया होणार असेल, तर किमान दोन आठवडे आधी हळदीचे दूध पिणे टाळावे, जेणेकरून शस्त्रक्रियेदरम्यान अतिरक्तस्त्रावाचा धोका राहणार नाही. ज्यांना वारंवार सिडिटी, पोट फुगणे किंवा गॅसचा त्रास होतो, अशा लोकांसाठी हळदीचे दूध त्रासदायक ठरू शकते. हळद उष्ण असल्याने काहींना जुलाब किंवा मळमळ असे त्रास होऊ शकतात.

# झेडपीच्या प्रचारात साड्यांचे वाटप

## भरारी पथकाने टेम्पो पकडला; १० लाखांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती–** कोल्हापूर जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना आमिष दाखवण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. करवीर तालुक्यात मतदारांना वाटण्यासाठी आणलेल्या साड्यांच्या टेम्पोवर भरारी पथकाने मोठी कारवाई केली आहे. करवीर तालुक्यातील पाडळी खुर्द परिसरात भरारी पथकाने संशयास्पद टेम्पो अडवत तपासणी केली. या टेम्पोमध्ये मोठ्या प्रमाणावर साड्यांच्या पिशव्या आढळून आल्या. जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर करवीर




तालुक्यातील महिला मतदारांना या साड्या वाटप केल्या जाणार होत्या. विशेष म्हणजे या साड्यांच्या पिशव्यांमध्ये स्थानिक उमेदवारांचे फोटो आणि हँडबिल्स ठेवण्यात आले होते. त्यामुळे ही साड्यांची वाटप प्रक्रिया निवडणूक आचार संहितेचे उल्लंघन असल्याचा संशय अधिक बळावला आहे.

भरारी पथकाने सुमारे सात ते दहा लाख रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. घटनास्थळी भरारी पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. निवडणुकीदरम्यान आमिषाच्या माध्यमातून मतदारांवर प्रभाव टाकण्याचे प्रकार रोखण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. पुढील चौकशी सुरू असून संबंधितांवर कारवाई होण्याची शक्यता आहे.

# फत्तेपुर येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७फत्तेपुर (जावरा) :** येथील ग्रामपंचायत कार्यालय फत्तेपुर येथे सोमवार दि. २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.सरपंच श्री. दिनेश लांडगे यांच्या आदेशानुसार यावर्षीच्या ध्वजारोहणाचा बहुमान ग्रामपंचायत कर्मचारी श्री. साहेबराव सोनटक्के यांच्या हस्ते पार पडला.

या प्रसंगी उपसरपंच सिद्धार्थ कटारणे, ग्रामपंचायत सदस्य प्रेमाताई इंगळे, जयमाला इंगोले, विशाल राऊत, सुवर्णा कुयटे, सीमा कठाणे, पोलीस पाटील रविंद्र मोक्कद्दम, माजी सरपंच वैशालीताई लांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच गजानन राऊत, नितेश कठाणे, नितीन झाडे, नरेश रुंधे, पवन अडसड, राजू कठाणे, सुदर्शन कठाणे, नरेश राऊत, राहुल राऊत, भूषण लांडगे, शरद राऊत, जिल्हा परिषद शिक्षक, अंगणवाडी सेविका व मदतनीस, आशा सेविका तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम देशभक्तीपूर्ण वातावरणात शांततेत पार पडला.

# जिल्हा परिषद शाळा रामगांवला प्रजासत्ताक दिना निमित्य सायकल वाटप

## गुणवंत विद्यार्थ्यांना दरवर्षी केल्या जाते सायकलचे वाटप


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७दर्यापूर–** जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी शाळा रामगांव येथे दर वर्षी प्रमाणे २६ जानेवारीला जे विध्यार्थी जिल्हा परिषद शाळा रामगांव येथे पाहिले ते ७ वी पर्यंत शिक्षण घेतात त्यांना वर्ग ७ वी मधील विदयार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक डी. आर जामनिक यांच्या स्व खर्चातून विधार्थ्यांना सायकल वाटप करीतात. हा उपक्रम जिल्हा परिषद शाळा रामगांव पंचायत समिती दर्यापूर येथे सन २०१६–१७ सुरु आहे



आज प्राजासत्तक दिना निमित्य वर्ग ७ वी विध्यार्थी च्या कु तेलज मिलिंद घरडे, सोहम राजेश नितनवरे, ऋशिकेस पवार, गौरव गिरी या विध्यार्थ्यांना शाळेचे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिवम रानडे, यांच्या हस्ते तसेच छायाताई संजय घरडे सरपंच, तेजस्वीनी अनिल घरडे उपसरपंच, सोनाली निलेश डोंगरे, उपाध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती तसेच माजी अध्यक्ष बंडूभाऊ घरडे,माजी उपाध्यक्ष सुभाष घरडे तसेच ग्रामपंचायत सदस्य पुरुषोत्तम भोरखडे,संगीता चारथळ, रजनी संतोष दोडमिसे संजय घरडे, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक गोपाल भाऊ वसू, गौतमभाऊ घरडे, रवींद्र घरडे, संजय चारथळ, दादारावजी घरडे,आशिष घरडे, अण्णा घरडे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य गण, शाळेचे मुख्याध्यापक डी आर जामनिक, तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद तसेच अंगणवाडी सेविका, मदतनीस व गावातील इतर पालक वर्ग उपस्थिती मध्ये कार्यक्रम संपन्न झाला. तसेच विध्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होऊन विदयार्थ्यांना खाऊ वाटप होऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# दहावी–बारावीच्या परीक्षेसाठी प्रशासन सज्ज



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती –** दहावी– बारावीची परीक्षा उंबरड्यावर आली आहे.या परीक्षेत कोणतेही गैरप्रकार होऊ नये यासाठी प्रशासनाने तयारी सुरू केली असून यंदा दहावीच्या परीक्षा २० फेब्रुवारी तर बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे.परीक्षेच्या काळात कॉपीमुक्त अभियान राबवले जाते यंदाही हे अभियान राबवले जाणार आहे.सध्या सरावा तसेच प्रॅक्टिकल परीक्षा सुरू आहे.लेखी परीक्षेसाठी मोजके दिवस शिल्लक असल्याने शिक्षकांकडून परीक्षेची तयारी सुरू केली आहे.



# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती–** पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्रेयसदादा पोटे पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीत गायन करण्यात आले.कार्यक्रमाला सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर श्रेयसदादा पोटे पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना भारतीय संविधानाचे महत्व सांगून तरुणांनी देशाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन केले.यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, भाषणे व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे आयोजन शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

# महावितरणमध्ये मनुष्यबळाचा दुष्काळ; २७,६७५ पदे रिक्त

## संघटनांकडून पदे भरण्यासाठी शासनाकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण) ही आशिया खंडातील वीज वितरण क्षेत्रातील एक अग्रगण्य सार्वजनिक कंपनी म्हणून ओळखली जाते. मात्र, सध्या या देदीप्यमान कामगिरीमागे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर प्रचंड ताण निर्माण झाला असून त्याचे मुख्य कारण म्हणजे राज्यभरात तब्बल २७ हजार ६७५ पदे रिक्त असणे हे आहे.महावितरणमध्ये राज्यात एकूण ८१ हजार ४६८ मंजूर पदे असून त्यापैकी केवळ ५४ हजार ७५७ कर्मचारी कार्यरत आहेत. उर्वरित मोठ्या संख्येतील रिक्त पदांमुळे दैनंदिन कामकाज, वीजपुरवठा, तक्रार निवारण तसेच थकबाकी वसुलीवरही विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप कर्मचारी संघटनांनी केला आहे.

राज्यातील तीन कोटी १७ लाखांहून अधिक कृषी, औद्योगिक, वाणिज्यिक व घरगुती ग्राहकांना अखंड वीजपुरवठा करण्याची जबाबदारी महावितरण पार पाडत आहे. सोलर कृषी पंप बसविण्याचा जागतिक विक्रम, तसेच अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार कंपनीच्या नावावर असले तरी, प्रत्यक्ष क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी पडत आहे.तांत्रिक संवर्गात मंजूर ४५ हजार ८०३ पदांपैकी १८ हजार ५०६ पदे रिक्त आहेत. यामध्ये मुख्य तंत्रज्ञ १९९, प्रधान तंत्रज्ञ ९१२, वरिष्ठ तंत्रज्ञ सहा हजार ६०१ आणि तंत्रज्ञ १२,३१३ पदांचा समावेश आहे. तंत्रज्ञ प्रवर्गात एक हजार ५१६ विद्युत सहायकांची भरती केली असली तरी ती अपुरी ठरत आहे. यंत्रचालक प्रवर्गातही स्थिती गंभीर आहे.

पदोन्नती व सरळसेवा भरतीतील १५ हजार ५२६ मंजूर पदांपैकी पाच हजार ६२१ पदे रिक्त आहेत. अभियंता प्रवर्गातही ६३३ पदे रिक्त असून लेखा, आयटी, कामगार, सुरक्षा, कायदेविषयक आदी विभागांमध्ये दोन हजार ९१५ पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांमुळे ग्राहक सेवेवर परिणाम होत असल्याच्या कर्मचाऱ्यांच्या तक्रारी आहेत.

### रिक्त पदे भरा, कर्मचाऱ्यांचा ताण कमी करा : मोहन शर्मा

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे अध्यक्ष मोहन शर्मा व सरचिटणीस कृष्णा भोयर यांनी तातडीने महावितरण कंपनीमधील २७ हजार ६७५ रिक्त पदे भरण्याची मागणी केली आहे. रिक्त पदांमुळे वीजबिल थकबाकी वाढत असून ग्राहक सेवाही खालावत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. महावितरणच्या कार्यक्षमतेसाठी मनुष्यबळ भरतीचा प्रश्न आता तातडीने सोडविण्याची गरज निर्माण झाली आहे. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी रिक्त पदे भरून कर्मचाऱ्यांवरील ताण कमी करावा, अशी मागणीही शर्मा व भोयर यांनी केली आहे.

**अशी आहेत रिक्त पदे**

तांत्रिक संवर्ग : १८५०६

यंत्रचालक संवर्ग : ५६२१

लेखा विभागासह अन्य कर्मचारी : २९१५

अभियंता संवर्ग : ६३३

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २७ जानेवारी २०२६

शहर/ग्रामिण

# जिल्ह्याच्या शेती, शिक्षण, औद्योगिक विकासावर भर देणार- शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे



## जिल्ह्यात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

## 'राष्ट्र प्रथम' संकल्पनेत देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती,**
जिल्ह्याला जागतिक नकाशावर स्थान मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. यासाठी शेती, शिक्षण उद्योग आणि महिला सक्षमीकरणाची कामे हाती घेण्यात आली आहे. यात प्रामुख्याने सिट्रस इस्टेटमधील एआय प्रकल्प आणि आशियातील सर्वात मोठे पायलट ट्रेनिंग सेंटर जिल्ह्याच्या प्रगतीला नवी दिशा देतील. शासन शेतकरी, महिला, युवा आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबवित असून प्रगत तंत्रज्ञानाने जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यात येणार आहे, असे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.

प्रजासत्ताक दिनाच्या ७७वा वर्धापन दिन पोलीस मुख्यालयाच्या परेड मैदानावर पार पडला. यावेळी त्यांनी जिल्ह्याच्या कृषी, शिक्षण , औद्योगिक, शैक्षणिक आणि पर्यटन क्षेत्रातील प्रगतीचा आलेख मांडला.यावेळी पद्मश्री पुरस्कार जाहीर झालेले जनार्दन बोथे गुरुजी, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, विशेष पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, मनपा आयुक्त सौम्या शर्मा, पोलिस आयुक्त राकेश ओला, जिल्हा पोलिस अधिक्षक विशाल आनंद तसेच इतर विभागातील अधिकारी आदी उपस्थित होते. मंत्री श्री. भुसे म्हणाले, शेतकरी हा देशाचा कणा असून गेल्या खरीप हंगामात नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना भरीव मदत केली आहे. कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात येत आहे. प्रामुख्याने संत्रा पिकासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' आधारित तंत्रज्ञानाचा प्रकल्प राबविला जात आहे. औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी 'पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क'ची स्थापना करण्यात आली असून अमरावती विमानतळावरील आशियातील सर्वात मोठे पायलट प्रशिक्षण केंद्र मैलाचा दगड ठरणार आहे.

चिखलदरा येथील 'स्कायवॉक'मुळे पर्यटनात वाढ होणार आहे. तसेच मेळघाटातील नाईट सफारी आणि 'मधाचे

### प्रत्यक्ष मैदानावर येऊन शिक्षण मंत्र्यांचे प्रोत्साहन

गाव' ही संकल्पना स्थानिक आदिवासींचे जीवनमान उंचावेल. तसेच सिंधी समाजाच्या नागरिकांना जमिनीचा मालकी हक्क दिला आहे. 'लाडकी बहीण' लाभार्थींनी पतसंस्था स्थापन करण्याचा अभिनव उपक्रम राबविला आहे.

प्रजासत्ताक दिनी राज्यभरातील १ लाख शाळांमधील २ कोटी विद्यार्थ्यांनी 'राष्ट्र प्रथम' या संकल्पनेवर आधारित देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायती सादर केल्या. ज्यामध्ये जिल्ह्यातील १ हजार ५०० विद्यार्थ्यांचा सहभाग घेवून आकर्षक कवायती सादर केल्या. विद्यार्थ्यांमध्ये प्रखर राष्ट्रभक्ती, स्वयंशिस्त आणि शारीरिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला शालेय शिक्षण मंत्र्यांनी मैदानावर येऊन दाद दिली. यावेळी त्यांच्यासह सर्वांनी टाळ्यांचा कडकडाटात विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. त्यांनी मुलींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण, माजी विद्यार्थी संघ स्थापना, विविध समित्यांचे एकत्रीकरण, कॉपीमुक्त अभियान आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वर्षभर राबवल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची घोषणा करीत शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा मानस व्यक्त केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रम गुरुकुंजचे सचिव जनार्दन बोथे गुरुजी यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झालाबद्दल श्री. भुसे यांनी श्री. बोथे गुरुजी यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. समाजसेवेसाठी श्री. बोथे गुरुजी यांना जाहीर झालेला पद्मश्री पुरस्कार हा सर्व अमरावतीकरांसाठी अभिमान आणि गौरवाचा क्षण असल्याचे ते म्हणाले.राष्ट्रध्वजाला मानवंदना दिल्यानंतर विविध पथकांनी परेड संचलन केले. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी जिल्हा 'बालविवाहमुक्त' करण्याबाबत शपथ देण्यात आली.

## पद्मश्री पुरस्काराने अमरावतीचा गौरव

## जनार्दन बोथे गुरुजींचा सत्कार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती–** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रम गुरुकुंजचे सचिव जनार्दन बोथे गुरुजी यांना जाहीर झालेल्या पद्मश्री पुरस्काराबद्दल राज्याचे मंत्री दादाजी भुसे यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला. समाजसेवेच्या माध्यमातून अमरावती जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल केल्याबद्दल हा पुरस्कार सर्व अमरावतीकरांसाठी अभिमानाचा क्षण असल्याचे श्री. भुसे यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. त्यानंतर विविध पथकांनी शिस्तबद्ध परेड संचलन केले. या प्रसंगी सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच जिल्हा 'बालविवाहमुक्त' करण्यासाठी उपस्थितांना सामूहिक शपथ देण्यात आली. कार्यक्रमास विविध मान्यवर, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाडसाला सलाम! अमरावतीच्या पोलिस अंमलदाराने ११ फूट पाण्याखाली १ मिनिट २२ सेकंद फडकवला तिरंगा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती–** महाराष्ट्र पोलीस दलात धाडस, शौर्य आणि कर्तृत्वाची परंपरा जपणारे अनेक अधिकारी व अंमलदार आहेत. त्यात अमरावती शहर पोलीस आयुक्तालयातील पोलीस अंमलदार प्रवीण दादाराव आखरे यांनी आपल्या असामान्य साहसाने पुन्हा एकदा पोलीस दलाचा मान उंचावला आहे. ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या पावन पर्वावर, प्रवीण आखरे यांनी कोणत्याही ऑक्सिजन उपकरणाचा वापर न करता, तब्बल ११ फूट खोल पाण्याखाली १ मिनिट २२ सेकंद श्वास रोखून तिरंगा ध्वज फडकावला. हा थरारक आणि प्रेरणादायी उपक्रम अमरावती पोलीस जलतरण केंद्रात पार पडला.हा उपक्रम पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, रमेश धुमाळ आणि शाम घुगे यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनात पार पडला. यावेळी आखरे यांनी हातात देशाचा तिरंगा अभिमानाने धरत हर घर तिरंगा या संकल्पनेला जलतरण केंद्राच्या पाण्यातून अनोखा साकार दिला.

प्रवीण आखरे हे अमरावती पोलीस आयुक्तालयातील जीव रक्षक तसेच शोध व बचाव पथकात कार्यरत असून, याआधीही त्यांनी अनेक साहसी आणि विक्रमांची नोंद असलेले उपक्रम केले आहेत. पाण्याखाली व पाण्यावर योगासने सादर करत त्यांनी इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स व एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये आपले नाव नोंदवले आहे. तसेच पाण्यात सायकल चालवणे, स्केटिंग करत तिरंगा फडकावणे, अशा अभिनव उपक्रमांतून त्यांनी अमरावती पोलीस मुख्यालयाचा गौरव वाढवला आहे.या धाडसी उपक्रमाची माहिती मिळताच, अमरावतीच्या लेडी गव्हर्नर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कमलाताई गवई यांनी सोमवारी अचानक पोलीस मुख्यालयाच्या जलतरण केंद्राला भेट देत प्रवीण आखरे यांचे स्वतः उपस्थित राहून स्वागत व अभिनंदन केले. प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्ती, शौर्य आणि सेवाभाव यांचा संगम साधणारा हा उपक्रम सध्या सर्वत्र प्रशंसेचा विषय ठरत आहे.

## प्रजासत्ताकदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर

## महिलेचा आत्मदहनाचा प्रयत्न

### पोलिसांच्या तत्परतेने अनर्थ टळला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**
सोमवार २६ जानेवारी प्रजासत्ता दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एका महिलेने अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याची गंभीर घटना घडली. मात्र पोलिसांच्या वेळीच केलेल्या हस्तक्षेपामुळे मोठी दुर्घटना टळली असून संबंधित महिलेचे प्राण वाचले.उषा गोंडाने (रा. संजय गांधी नगर क्रमांक १, अमरावती) असे या महिलेचे नाव आहे. काही नागरिकांनी आपली आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप करत त्यांनी न्यायासाठी वारंवार पोलीस स्टेशन व प्रशासकीय यंत्रणेकडे पाठपुरावा केला. मात्र कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने आपणास न्याय मिळत नसल्याची भावना निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.घटनेपूर्वी उषा गोंडाने यांनी पत्रकार परिषदेतून आत्मदहनाचा इशारा दिला होता. त्यानंतर त्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर पेट्रोलची कॅन घेऊन पोहोचल्या आणि स्वतःला जाळून घेण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार लक्षात येताच गाडगे नगर पोलिसांनी तत्काळ धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.या कारवाईत गोपनीय अंमलदार अमोल पाटील, स्नेहल राऊत, पल्लवी गणेश यांच्यासह पोलिस कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. संबंधित महिलेला पुढील चौकशीसाठी फ्रेजरपूरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. प्रजासत्ताकदिनी घडलेल्या या घटनेमुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## बुंदेलपुरातील प्रतिबंधित जागेवर मंदिर उभारणीचा प्रयत्न

### पोलिसांनी तणाव निवळला, नगरपालिकेकडून तक्रार दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अचलपूर :**
येथील बुंदेलपुरा भागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ शासनाने प्रतिबंधित घोषित केलेल्या रिक्त जागेवर रविवारी काही नागरिकांनी मंदिर उभारणीचा प्रयत्न केल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. माहिती मिळताच अचलपूर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन कठोर भूमिका घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.सदर जागेवर शासनाच्या परवानगीशिवाय कोणतेही बांधकाम करण्यास मनाई आहे. मात्र काही महिला व पुरुषांनी कॉलम खोदून मंदिर बांधण्यास सुरुवात केल्याने वाद निर्माण झाला. पोलिसांनी दोन्ही पक्षांना समज देण्याचा प्रयत्न केला; मात्र काही महिलांकडून पोलिसांशी बाचाबाची व लोटलोटी झाली. यानंतर संबंधितांना ताब्यात घेऊन अचलपूर पोलीस ठाण्यात नेण्यात आले. नंतर त्यांची सुटका करण्यात आली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या सौंदर्यीकरणासाठी शासनाकडून निधी प्राप्त असून परिसरात फेन्सिंग करण्यात आली आहे. नगरपरिषद प्रशासनाकडून याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करणयातआल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

## मुख्यमंत्री १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमात अमरावती महानगरपालिकेला राज्यात पाचवा क्रमांक

### आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या नेतृत्वाखाली उल्लेखनीय यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती** महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या मुख्यमंत्री १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांच्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद यांच्या वतीने करण्यात आले. या मूल्यमापनाचे निकाल आज प्रजासत्ताक दिनाच्या औचित्यावर मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते जाहीर करण्यात आले.या मूल्यमापनात महाराष्ट्रातील २९ महानगर पालिकांमध्ये अमरावती महानगर पालिकेने २०० पैकी १७९.५० गुण प्राप्त करत राज्यात पाचवा क्रमांक पटकावला आहे. ही कामगिरी अमरावती महानगर पालिकेच्या प्रशासनिक आणि डिजिटल कार्यक्षमतेचे प्रतिक ठरली आहे.सदर मूल्यमापनामध्ये कार्यालयाची अधिकृत वेबसाईट, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सप चॅटबॉट, शासकीय कामकाजात -ख व इश्रेलज्ञलहरळप चा वापर तसेच ऋखड तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर अशा सात सर्वंकष निकषांवर कामगिरीचे मूल्यांकन करण्यात आले.अमरावती महानगर पालिकेने या सर्व निकषांवर उत्कृष्ट अंमलब जावणी करत डिजिटल प्रशासनात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक (भा.प्र.से.) यांच्या सक्षम नेतृत्वाखाली ई-गव्हर्नन्स उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, नाविन्यपूर्ण तांत्रिक प्रयोग आणि प्रशासनातील पारदर्शकता यावर विशेष भर देण्यात आला.या कार्यक्रमांतर्गत टउख तर्फे विकसित करण्यात आलेल्या स्वतंत्र ऑनलाईन पोर्टलवर सर्व संबंधित माहिती व कार्यप्रगती सादर केल्यानंतर प्राथमिक निवड करण्यात आली. त्यानंतर निवडक कार्यालयांची टउख कडून सखोल मुलाखत घेण्यात आली. अमरावती महानगर पालिकेच्या ई-गव्हर्नन्स क्षेत्रातील प्रत्यक्ष अंमलबजावणी, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि तांत्रिक वापराच्या आधारे अंतिम निवड करण्यात आली.या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना आयुक्त सौम्या शर्मा चांडक म्हणाल्या ,महानगरपालिकेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हे यश मिळाले आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रशासन अधिक पारदर्शक, सुलभ आणि नागरिकाभिमुख करण्याचा आमचा प्रयत्न आहे. भविष्यातही नागरिकांना अधिक प्रभावी व दर्जेदार सेवा देण्यासाठी आम्ही सातत्याने कार्यरत राहू, असे त्यांनी सांगितले.ही कामगिरी अमरावती महानगरपालिकेच्या डिजिटल प्रशासनाच्या दिशेने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित असून, भविष्यात नागरिकांना अधिक पारदर्शक, सुलभ व प्रभावी सेवा देण्यासाठी प्रेरणादायी ठरणारी आहे.मुख्यमंत्री १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कृती कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या अंतिम मूल्यमापनात अमरावती महानगरपालिकेने राज्यात पाचवा क्रमांक पटकावला आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील मोठ्या महानगरपालिका व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी स्पर्धा करत ही कामगिरी अमरावती महानगरपालिकेसाठी अभिमानास्पद ठरली आहे.



या यशामागे ई-गव्हर्नन्सच्या क्षेत्रात राबविण्यात आलेल्या विविध नाविन्यपूर्ण व प्रभावी उपक्रमांचा मोठा वाटा आहे. त्यामध्ये 'माय अमरावती' व्हॉट्सप चॅटबॉट व चॅनलद्वारे नागरिकांशी थेट संवाद, रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानावर आधारित 'कूल रूफ' उपविधी २०२५, ऋखड व ड्रोन मॅपिंगद्वारे सुधारित मालमत्ता कर मूल्यांकन तसेच स्वच्छता वॉर रूम, ई-ऑफीस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी व जलद सेवा वितरण, तसेच शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (ऋेींशीपाशपीं झीलशीी ठश-शपसळ-पशशीळपस) या उपक्रमांचा समावेश आहे.

# अमरावती महानगर पालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या गटनेता पदी अविनाश मार्डीकर यांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

नुकत्याच झालेल्या अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ११ जागा मिळाल्या आहेत .महाराष्ट्र शासनाने मनपा निवडणुकीतील विजयी उमेदवारांचे गॅझेट प्रसिद्ध केल्यानंतर आता महापालिकेतील गटनेता निवडीला घेऊनही राजकीय पक्षांमध्ये हालचाली सुरू आहेत त्या अनुषंगाने अमरावती महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने अविनाश गुलाबराव मार्डीकर यांची गटनेता म्हणून निवड करण्यात आली आहेअमरावती महानगर



पार्टी कडून अविनाश मार्डीकर यांच्या समवेत मंगेश मनोहरे,मनीष बजाज, प्रमोद महल्ले, चंदू खेडकर, शेख जफर, रतन डेंडुले, सौ मीनल योगेश सवाई, सौ अर्चना मनीष पाटील, सौ. ममता संदीप आवारे, तसेच गुड्डू उर्फ प्रशांत धर्माळे असे ११ नगरसेवक नवनिर्वाचित झाले महापालिकेत होणाऱ्या महापौर व उपमहापौर निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झाला असताना आता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या गटनेता पदी अविनाश मार्डीकर यांची निवड करण्यात आली आहे आज राष्ट्रवादीच्या सर्व नव- नवनिर्वाचित नगरसेवकांनी राष्ट्रवादीचे महासचिव तसेच आमदार सौ. सुलभाताई खोडके यांची भेट घेतली. यावेळी आमदार महोदयांच्या वतीने गटनेता अविनाश मार्डीकर तसेच सर्व ११ नगरसेवक यांचे स्वागत व अभिनंदन करण्यात आले.

अविनाश मार्डीकर हे महानगरपालिकेतील जेष्ठ नगरसेवक असून एक अभ्यासू व्यक्ती म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांनी महापालिकेत स्थायी समितीचे सभापतीपद देखील भूषविले असून विविध समित्यांवर काम करण्याचा त्यांना चांगला अनुभव आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात देखील त्यांचे मानाचे व मोलाचे स्थान असून आमदार संजय खोडके यांचे अत्यंत निकटवर्ती व विश्वासू म्हणूनही त्यांची ख्याती आहे. अमरावती महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कडून गटनेता पदी अविनाश मार्डीकर यांची निवड झाल्याने सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# वर्धा नदीच्या पात्रात रेती माफियांचा धुडगूस

## धारवाडा बॅकवॉटरमध्ये रात्रीचा खेळ उघड – १७ ब्रास रेती जप्त, दोघांवर गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

शासनाने अवैध रेती उत्खननावर बंदी घातलेली असतानाही वर्धा नदीच्या बॅक वॉटरमध्ये रेती माफियांनी अक्षरशः नदीच्या छाताडावर घाला घातल्याचा धक्कादायक प्रकार जुना धारवाडा येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणात महसूल व पोलिसांच्या संयुक्त कारवाईत १७ ब्रास अवैध रेती जप्त करण्यात आली असून, धारवाडा येथील दोन व्यक्तींविरुद्ध फौजदारी गुन्हा



दाखल करण्यात आला आहे.

आशिष किसनराव रताळे व विजय योगेश्वर इंदोरे (रा. धारवाडा, ता. तिवसा) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी ग्राम महसूल अधिकारी संतोष दामोदर मानमोडे (वय ४७, रा. अमरावती) यांनी पोलिस स्टेशन कुर्हा येथे २४ जानेवारी रोजी लेखी तक्रार दिली आहे.

माहितीनुसार, महसूल अधिकारी मानमोडे हे आपल्या सहकार्यांसह मूर्तिजापूर तरोडा येथून जुना धारवाडा परिसरातील वर्धा नदीच्या बॅकवॉटर काठावर पाहणीसाठी गेले असता, नदीच्या मध्यभागी दोन बोटी, इंजिन व रेती उपसण्याचे साहित्य स्पष्टपणे दिसून आले. तपासणी दरम्यान इंजिनच्या साह्याने रेती उपसा सुरू असतानाच दोघे आरोपी रंगेहात आढळून आले. अधिकार्यांनी आवाज दिल्याचा क्षणातच संशयितांनी बोटी व इंजिन घेऊन वर्धा जिल्ह्याच्या हद्दीत पलायन केले, मात्र उत्खनन करून बॅकवॉटर काठावर साठवून ठेवलेली १७ ब्रास रेती प्रशासनाच्या हाती लागली. सदर रेतीची किंमत अंदाजे १ लाख २ हजार रुपये इतकी असल्याचे सांगण्यात आले आहे.

कारवाईनंतर सदर जप्त रेती पोलिस पाटील दुर्गवाडा यांच्या ताब्यात देण्यात आली. आरोपींविरुद्ध अवैध रेती उत्खनन, शासनाची मालमत्ता चोरणे, पर्यावरणाचा र्हास करणे व बेकायदेशीर साठवणूक या गंभीर स्वरूपाच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास कुर्हा पोलिसांकडून सुरू आहे.वर्धा नदी परिसरात वाढत चाललेल्या अवैध रेती उत्खननामुळे पर्यावरणीय समतोल धोक्यात आला असून, नदीपात्र खोल होत असल्याने पूरस्थितीचा धोका देखील वाढत आहे.

# अमरावती APMC च्या विभाजनाला तात्पुरती स्थगिती

## प्रशासकांचे कामकाज रोखले; सभापती हरिश मोरे यांची याचिका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचे विभाजन करून भातकुली येथे स्वतंत्र बाजार समिती स्थापन करण्याच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने तात्पुरती स्थगिती दिली आहे. या निर्णयामुळे अमरावती आणि भातकुली या दोन्ही बाजार समित्यांवर नियुक्त करण्यात आलेल्या प्रशासकांना पुढील आदेशापर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यास मनाई करण्यात आली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी बुधवार, २८ जानेवारी रोजी होणार आहे.




येथील जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) यांनी दोन दिवसांपूर्वी बाजार समितीच्या विभाजनाची अधिसूचना जारी केली होती. या निर्णयामुळे अडीच वर्षांपासून कार्यरत असलेले १७ सदस्यीय संचालक मंडळ आपोआप बरखास्त झाले होते. संचालक मंडळ बरखास्त झाल्यामुळे दोन्ही बाजार समित्यांवर प्रशासकांची नियुक्तीही करण्यात आली होती.

या कारवाईविरोधात सभापती हरीश मोरे यांच्यासह संचालकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सुनावणीदरम्यान न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, याच विषयावर यापूर्वी दाखल असलेल्या दोन याचिकांमध्ये अंतिम आदेश देण्यास मनाई असताना प्रशासकीय ताबा घेणे व कपाटे सील करणे हे प्राथमिकदृष्ट्या न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात आहे. त्यामुळे २८ जानेवारीपर्यंत प्रशासकांना कार्यवाही करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. न्या. श्रीमती एम. एस. जवळकर व न्या. नंदेश देशपांडे यांच्या न्यायपीठासमोर या याचिकेची सुनावणी होईल.

या न्यायालयीन आदेशावर प्रतिक्रिया देताना अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश मोरे म्हणाले की, हा सत्याचा विजय आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता निवडून आलेल्या संचालक मंडळाला हटवणे हे लोकशाहीविरोधी होते, असेही त्यांनी नमूद केले. न्यायालयाने दिलेली स्थगिती ही शेतकरी, व्यापारी आणि सहकार क्षेत्राच्या हिताची असल्याचे मोरे यांनी सांगितले.

# चिखलदऱ्यात जाणाऱ्या पर्यटकांसाठी गुड न्यूज

## स्कायवॉक पूर्णत्वाकडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७चिखलदरा**

चिखलदरा हे विदर्भाचे नंदनवन असून थंड हवेचे ठिकाण आहे. या ठिकाणी संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरातील पर्यटक हजेरी लावतात. येथील जंगल सफारी व व्याघ्र प्रकल्प प्रसिद्ध आहे. येथील आशिया खंडातल्या सर्वांत लांब स्कायवॉकचे काम पूर्णत्वाकडे जात आहे. स्कायवॉक प्रकल्पाची लांबी ४०७ मीटर इतकी आहे तर याचे काम पूर्ण करण्यासाठी ४०.२६ कोटी इतके निधी खर्च होणार आहे.

या प्रकल्पाचे काम २०१९ मध्ये सुरू झाले असून मार्च २०२६



ही डेडलाईन आहे. त्या पद्धतीने ठेकेदार कामाला गती देत असल्याचे दिसून येत आहे. हा प्रकल्प पूर्ण झाला तर या ठिकाणी पर्यटकांची संख्या वाढणार आहे. या ठिकाणच्या स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार प्राप्ती होईल. स्थानिकांच्या हातामध्ये पैसा खेळेल. स्कायवॉक हरिकेन पॉईंट ते गोराघाट पॉईंटला जोडणारा आहे. या दोन पॉईंटच्या दरी मध्ये हा स्कायवॉक बांधण्यात आलेला आहे. हा स्कायवॉक जवळपास पूर्ण झाला आहे. १५ टक्के काम शिल्लक आहे. स्थानिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. पर्यटक देखील आनंदीत झाले आहे.

स्कायवॉकचे स्ट्रक्चर पूर्ण उभे झाले असून ठेकेदार पूर्ण ताकतीने काम करताना दिसून येत आहे. या टोकापासून तर त्या टोकापर्यंतचे लोखंडी स्ट्रक्चर पूर्ण झाले असून काच लावणे व इतर किरकोळ कामे पूर्ण व्हायला चार ते पाच महिन्याचा अवधी लागू शकतो. एका अधिकार्याने बोलताना सांगितले की, डेकचे काम आज पूर्ण झाले आहे. सपोर्टची सुद्धा तात्पुरती परवानगी मिळाली आहे. मार्चपर्यंत संपूर्ण स्कायवॉक काम पूर्ण होईल.

# बोली जिवंत तरच मराठी भाषा समृद्ध राहील

## कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती,:** मराठी भाषेचे खरे सामर्थ्य तिच्या प्रमाणभाषेत नव्हे, तर तिच्या विविध बोलींमध्ये दडलेले आहे. बोली टिकल्या तरच भाषा जिवंत राहते आणि पुढील पिढीपर्यंत तिचा वारसा पोहोचतो, असे ठामपणे नमूद केले. बोलीभाषांमधून लोकजीवन, संस्कृती, मूल्ये आणि इतिहास यांचे प्रतिबिंब उमटते. त्यामुळे बोलीभाषांचे शास्त्रीय अध्ययन, दस्तऐवजीकरण आणि विद्यापीठीय पातळीवर संशोधन होणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी केले.

मराठी भाषेच्या विविध बोलींचे जतन, संवर्धन व संरक्षण या उद्देशाने भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुरस्कृत आणि मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा या निमित्ताने ‘बोलींचा जागर’ हा विशेष कार्यक्रम मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर (अमरावती) येथे मोठ्या उत्साहात व अभ्यासपूर्ण वातावरणात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. मराठी ज्ञानपरंपरेचे प्रतीक असलेल्या ग्रंथदिंडीने कार्यक्रमाची भारदस्त व संस्कारक्षम सुरुवात झाली. परंपरा, संस्कृती आणि बोलीवैभव यांचा सुरेख संगम साधणारी ही ग्रंथदिंडी उपस्थितांच्या मनावर विशेष ठसा उमटवून गेली. मराठी भाषेच्या समृद्ध बोलीपरंपरेचे दर्शन घडवणार्या या कार्यक्रमात कोकणी, वर्हाडी, ठाकर, कोरकू आदी बोलींच्या लोककलांचे सादरीकरण, बोलीभाषांवरील




संवाद सत्रे तसेच अभ्यासकांचे सखोल मार्गदर्शन यामुळे उपस्थितांना महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा जिवंत अनुभव घेता आला. प्रमुख अतिथी डॉ. काशिनाथ बहाडे यांनी कोरकू बोलीच्या उदाहरणातून बोलीभाषा व समाजजीवन यांचे अतूट नाते स्पष्ट केले. बोलीभाषा ही केवळ संवादाचे साधन नसून त्या-त्या समाजाची ओळख, जीवनदृष्टी आणि अनुभवविश्व व्यक्त करणारी समृद्ध सांस्कृतिक ठेव आहे, असे त्यांनी सांगितले. डॉ. मंदा नांदूरकर यांनी आपल्या भाषणात कोरकू संस्कृतीचे वैशिष्ट्य सविस्तरपणे उलगडून सांगितले. कोरकू समाजाची बोली, लोकगीतं, सण-उत्सव, नृत्यपरंपरा, श्रद्धा आणि निसर्गाशी असलेले नाते यांमधून एक स्वतंत्र व समृद्ध सांस्कृतिक विश्व व्यक्त होते. कोरकू संस्कृती ही केवळ भूतकाळाचा वारसा नसून आजही जिवंत असून तिच्यातून आदिवासी समाजाची जीवनदृष्टी, सामूहिकता आणि मूल्यव्यवस्था स्पष्टपणे दिसून येते. या संस्कृतीचे संवर्धन करताना भाषेसह परंपरा, लोकज्ञान आणि जीवनशैलीचेही जतन आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमातील लोककला सादरीकरण विशेष आकर्षण ठरले. ‘जागर मराठी भाषेचा’ या प्रभावी नाट्यसादरीकरणातून मराठी भाषेचा इतिहास, बोलीभाषांचे वैभव, लोकजीवनातील भाषेचे स्थान आणि तिचे सांस्कृतिक सामर्थ्य अत्यंत भावस्पर्शी पद्धतीने मांडण्यात आले. संवाद, गीत, अभिनय आणि लोकधाटीच्या सादरीकरणामुळे प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले व या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.शासकीय प्रतिनिधी म्हणून संतोष गोसावी (भाषा उपसंचालक, भाषा संचालनालय ) यांनी मराठी भाषेच्या बोलींचे दस्तऐवजीकरण व संवर्धनासाठी शासनाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. बोलीभाषा जतनासाठी शैक्षणिक संस्था, अभ्यासक आणि समाज यांचा समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. सूत्रसंचालन डॉ. आशालता गुट्टे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन मराठी भाषा विद्यापीठ अधिष्ठात डॉ. कोमल ठाकरे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, संशोधक, अभ्यासक व मराठी भाषा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दारापूर ग्रामपंचायत चे उपसरपंच

# जमील पटेल यांचे ग्रामपंचायत समोर २६ जानेवारीपासून आमरण उपोषण

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२७दारापूर**

अमरावती जिल्ह्यातील दारापूर व खेलनागवे परिसरात सन फेब्रुवारी २०२१ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत शासकीय निधीतून करण्यात आलेल्या विकासकामांमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप दारापूर ग्रामपंचायतीचे उपसरपंच जमील पटेल यांनी केला आहे. संबंधित कामे ठेकेदार विलास बननोटे यांनी केली असून,या कामांचा दर्जा अत्यंत निष्कृष्ट असल्याच्या तक्रारी वारंवार करण्यात आल्या आहेत.तक्रारी करूनही आजपर्यंत कोणतीही चौकशी अथवा कारवाई करण्यात आलेली नाही. प्रशासनाकडून केवळ थातूरमातूर उत्तरे दिली जात असल्याचा आरोप उपसरपंच पटेल यांनी केला आहे. याबाबत त्यांनी दर्यापूर पंचायत समितीला लेखी निवेदन देत, कामांच्या दर्जाची तातडीने चौकशी करण्यात यावी,अशी मागणी केली होती.जर चौकशी



करण्यात आली नाही,तर ग्रामपंचायत दारापूर कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता.यासंदर्भातील पत्र गटविकास अधिकारी,पंचायत समिती दर्यापूर यांना ८ जानेवारी २०२६ रोजी देण्यात आले होते.मात्र यावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने उपसरपंच जमील पटेल यांनी २६ जानेवारीपासून आमरण उपोषणास बसण्याचा निर्णय घेतला आहे.या प्रकरणात आता गटविकास अधिकारी,पंचायत समिती दर्यापूर कोणता निर्णय घेतात,याकडे सर्वांचे लक्ष लागले असून प्रशासनाची पुढील भूमिका काय असणार,हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# पाच दिवसांचा आठवडा मागणीसाठी बँक कर्मचारी आक्रमक, अमरावतीत व्यवहार पूर्णतः ठप्प

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती** – पाच दिवसांचा आठवडा लागू करावा तसेच इतर प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी देशभरातील बँक कर्मचाऱ्यांनी आक्रमक आंदोलन छेडले आहे. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या देशव्यापी संपाच्या हाकेला अमरावती जिल्ह्यातही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत व खासगी बँकांमधील कर्मचाऱ्यांनी कामकाज बंद ठेवत आंदोलनात सहभाग नोंदवला.संपामुळे अमरावती शहरासह ग्रामीण भागातील बँकिंग व्यवहार आज पूर्णपणे ठप्प झाले. रोख व्यवहार, धनादेश क्लिअरन्स, कर्जविषयक प्रक्रिया व इतर सेवा बंद असल्याने ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय झाली. अनेक शाखांमध्ये शटरडाऊनचे चित्र दिसून आले.बँक शाखांसमोर जमलेल्या कर्मचाऱ्यांनी सरकारविरोधात घोषणाबाजी करत पाच दिवसांचा आठवडा, कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना, वेतन सुधारणा व इतर मागण्यांची तातडीने पूर्तता करण्याची मागणी केली. बँक कर्मचाऱ्यांच्या मते, कामाचा वाढता ताण व मनुष्यबळाची कमतरता लक्षात



घेता पाच दिवसांचा आठवडा अत्यावश्यक आहे.संपादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले. शहरात शांतता असून पुढील आंदोलनाबाबत निर्णय केंद्र सरकारच्या भूमिकेवर अवलंबून असल्याचे संघटनांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.पाच दिवसांचा कामकाजाचा आठवडा लागू झाल्यास कर्मचाऱ्यांना त्यांच्या कौटुंबिक व वैयक्तिक आयुष्यासाठी वेळ देता येईल, असे मुळे यांनी नमूद केले. बँक कर्मचारी यांच्या कामकाजात सातत्याने ताणतणाव असतो त्यामुळे त्यांना काहीसा दिलासा मिळणे देखील गरजेचे आहे. इन्शुरन्स, रिझर्व्ह बँक, तसेच शेअर मार्केटसह अनेक वित्तीय संस्थांमध्ये पाच दिवसीय कामकाजाची अंमलबजावणी होत असताना, बँकिंग क्षेत्रात मात्र याबाबत होत असलेल्या दिरंगाईमुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.केंद्र सरकारने लवकरात लवकर पाच दिवसीय बँकिंग आठवड्याची अंमलबजावणी न केल्यास, भविष्यात आणखी तीव्र स्वरूपाची आंदोलने व संप करण्यात येतील, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# महापौरपदाच्या रणनितीसाठी वर्षा बंगल्यावर आज महत्त्वपूर्ण बैठक

## मुख्यमंत्री फडणवीस, पालकमंत्री बावनकुळे व आमदार रवी राणा यांच्यात चर्चा

## ऋषिकेश देशमुख ला लागेल का? महापौर पदाची लॉटरी शहरात चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती** - अमरावती महानगरपालिकेतील आगामी महापौर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज मंगळवार, २७ जानेवारी रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा बंगल्यावर एक अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला राज्याचे महसूल मंत्री तसेच अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि आमदार रवी राणा उपस्थित होते, दुपारी २ वाजता ही बैठक पार पडली आहे.महानगरपालिकेतील सत्तास्थापनेसाठी आणि महापौरपदासाठीची संपूर्ण राजकीय रणनिती या बैठकीत ठरविण्यात आली आहे या बैठकीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते. अलीकडेच पार पडलेल्या अमरावती महानगरपालिका



निवडणुकीत भाजपने सर्वाधिक २५ जागांवर विजय मिळवत सर्वात मोठा पक्ष म्हणून आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. तर आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाचे १५ उमेदवार निवडून आले आहेत.महापौर पदासाठी सध्या च्या घडीला ऋषिकेश देशमुख, श्रीचंद तेजवाणी,आशिष अतकरे यांच्या नावासह अन्य नावांचीही चर्चा आहे.मात्र सूत्रांच्या मिळालेल्या माहितीनुसार ऋषिकेश देशमुख यांचे नाव आघाडीवर असल्याचे समजते.

महानगरपालिकेत स्पष्ट बहुमतासाठी आवश्यक संख्याबळ कोणाकडेही नसल्याने, भाजप आणि युवा स्वाभिमान पक्ष यांच्यातील युती आणि सत्तास्थापनेबाबत अंतिम निर्णय या बैठकीत घेतला गेला आहे. महापौरपदाचा उमेदवार कोण असावा, पदांची विभागणी, तसेच पुढील राजकीय समन्वय याबाबत सविस्तर चर्चा होणार ही या बेठकीत झाली असल्याचे समजते.-

# किन्नर दोन गटांतील वाद पुन्हा उफाळला

## शेगाव नाका परिसरात थरार...

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती**

अमरावती शहरात किन्नरांच्या दोन गटांमधील जुना वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून शेगाव नाका येथील आशियाड कॉलनी चौकात सोमवारी सायंकाळी तुफान हाणामारी झाली. दोन गट आमने-सामने आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

या वादाला हिंसक वळण लागले असून एका गटाकडून चाकू व तलवारीचा वापर केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.या हल्लयात मधु सनातन करमकर, रितू विनोद



सरकटे आणि किंजल पाटील हे तीन किन्नर जखमी झाले असून त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. जखमींच्या पाठीवर, हातावर व कमरेवर गंभीर जखमा झाल्या आहेत. घटनेची माहिती मिळताच गाडगे नगर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली, मात्र हल्लेखोर पसार झाले होते. सर्व जखमींना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, किन्नर आम्रपालीसह इतर सहकाऱ्यांनी गाडगे नगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. न्याय न मिळाल्यास आत्मदहनाचा इशारा ही यावेळी देण्यात आल्याने शहरात तणावाचे वातावरण आहे. सध्या परिसरात कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.


# केवळ ज्येष्ठतेमुळे नाही मिळणार बढती

## शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा सक्तीची

### शालेय शिक्षण विभागाचा मोठा निर्णय;

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती**- शिक्षक संवर्गातून पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख तसेच विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदांवर पदोन्नती मिळविण्यासाठी आता शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण असणे शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भात शासन निर्णय (जीआर) जारी केल्याने केवळ ज्येष्ठतेच्या आधारे दिल्या जाणाऱ्या बढत्यांना थेट लगाम बसणार आहे. परिणामी वर्षानुवर्षे सेवा दिलेल्या, प्रमोशनच्या प्रतीक्षेत असलेल्या शिक्षकांमध्ये नाराजी पसरली आहे. अनिवार्य करण्यात आले आहे. शालेयसर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार, टीईटी परीक्षा केवळ नवीन भरतीसाठीच नव्हे, तर पदोन्नतीसाठी आणि सेवेत टिकून राहण्यासाठीही सक्तीची



करण्यात आली आहे. पहिली ते आठवीपर्यंत अध्यापन करणारे सर्व शिक्षक तसेच पदोन्नती हवी असल्यास टीईटी अपरिहार्य ठरविण्यात आली आहे. यामुळे पदोन्नतीची स्वप्ने रंगविणाऱ्या शिक्षकांच्या स्वप्नांवर न्यायालयीन शिक्का बसला आहे.नवीन शासन निर्णयानुसार टीईटी उत्तीर्ण नसलेल्या शिक्षकांना पदोन्नती देता येणार नाही. त्यामुळे पदोन्नतीसाठी पात्रता व परीक्षा अनिवार्य झाली आहे.शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने हा निर्णय अंमलात आणत स्पष्ट केले आहे की, गुणवत्ताधारित पदोन्नती हीच पुढील धोरणात्मक दिशा असेल. आतापर्यंत ज्येष्ठतेच्या आधारे बढती मिळत होती; मात्र आता गुणवत्ता, अध्यापन कौशल्य आणि टीईटी पात्रतेला प्राधान्य दिले जाणार आहे.

# निवृत्तीनंतर सरन्यायाधीश भूषण गवई आता राजकारणात येणार का?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७मुंबई**

मी कोणतेही राज्यपाल पद स्वीकारणार नाही. पण बाकीच्या गोष्टींचा अद्याप विचार केला नाही. विचार करायला वेळ मिळाला नाही. आज याबाबत मी काहीच बोलू शकत नाही असे मत निवृत्त सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केले. नियतीच्या मनात काय असेल तर हे कोणाला माहीत नसते असे भूषण गवई म्हणाले. एकदा सरन्यायाधिश झाल्यानंतर एखाद्या राजकीय पक्षांशी संबंध जोडण्यात चुकीचे काही नाही असे गवई म्हणाले.

निवृत्तीनंतर अनेक न्यायाधिशांना राजकीय पक्षांकडून ऑफर येतात. अनेकजण पक्षामध्ये प्रवेश करतात, काहीजण राज्यपाल होतात तर काहीजण राज्यसभेवर जातात. तुम्हाला अशी संधी मिळाली तर काम करणार का? याबाबत प्रश्न विचारल्यावर गवई बोलत होते.

प्रत्येकाला एक विचारधारा असते. मी जरी जज झालो तरी माझ्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संस्कार माझ्या वडिलांनी केले. रिपब्लिकन चळवळीचे संस्कार झाले. बाबासाहेबांच्या राजकीय आणि आर्थिक सामाजिक विचारांमुळं मला वेगळं करण्याची संधी मिळाल्याचे भूषण गवई म्हणाले. मी ज्या विचारांनी पुढे गेलो त्यासंदर्भात काही केलं तर पण घेईल असे नाही असेही गवई म्हणाले. सध्या माझ्या डोक्यात काहीच नाही असे भूषण गवई म्हणाले.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्वात महत्वाचे



काम म्हणजे देशाला राज्यघटना दिली.

यामध्ये राजकीय, सामाजिक आणि आर्थिक समानतेचा विचार त्यांनी दिली. मी नेहमीच भाषणात सांगतो की, या देशामध्ये राजकीय समानता दिली आहे.

पण सामाजिक आणि आर्थिक समानतेचं काय? या देशामध्ये सामाजिक आणि आर्थिक राजकीय समानता आणत नाहीत तोपर्यंत या देशात खऱ्या अर्थानं लोकशाही येणार नाही असे आंबेडकर म्हणाले होते. ही परिस्थिती अशीच राहीली तर पत्त्याप्रमाणे लोकशाही ढासळेल असे आंबेडकर म्हणाले होते असे भूषण गवई म्हणाले.

### वडिलांकडून अनेक गोष्टी शिकलो

वडिलांकडून अनेक गोष्टी शिकलो. सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे कोणाच चांगलं करता येत असेलत चांगल कर पण चुकूनही कोणाचे नुकसान करु नको. आयुष्यात मी ते करण्याचा प्रयत्न केला आहे. मनापासून समाजासाठी काहीतरी करावं असं वडिलांना वाटत होते असे गवई म्हणाले. आईकडून कष्ट करण्याची प्रेरणा मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले.

## खाद्यतेलाला महागाईचा तडका

# शेंगदाणा तेल दोनशे रुपये किलोवर

### सततच्या वाढत्या महागाईने गृहिणीचे बजेट कोलमडले : अतिवृष्टीमुळे बसला फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती**

अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान, सोयाबीनच्या दरात झालेली वाढ, खाद्यतेलावर २० टक्के आयात शुल्क आणि डॉलरच्या वाढत्या किमती यांचा एकत्रित परिणाम राज्यातील खाद्यतेलाच्या बाजारावर दिसून येत आहे. बऱ्याच दिवसांपासून स्थिर असलेले खाद्यतेलाचे भाव अचानक वाढल्याने गृहिणींच्या स्वयंपाकघराचा अर्थसंकल्प बिघडला आहे. सण-उत्सव नसतानाही झालेली ही दरवाढ सर्वसामान्यांच्या खिशाला चटका देणारी ठरत आहे.विशेषतः शेंगदाणा तेलाच्या दरात सर्वाधिक वाढ नोंदवली गेली आहे. शेंगदाणा तेल २०० रुपये किलोवर पोहोचले आहे.पुढील एक-दोन महिन्यांत नवीन आवक ' वाढली नाही तर तेलाचे दर आणखी ५ ते १० टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. मात्र आंतरराष्ट्रीय बाजारात दिलासा मिळाल्यास दर स्थिर होऊ शकतात.



**सणवार नसतानाही खाद्यतेलात दरवाढ**

साधारणतः सणासुदीच्या काळात खाद्यतेलाच्या दरात वाढ होते. मात्र, यंदा कोणताही मोठा सण नसतानाही तेलाच्या दरात लक्षणीय वाढ झाली आहे. किरकोळ बाजारात दर आठवड्याला दरवाढ होत असल्याचे चित्र आहे.

### सर्वाधिक भाव शेंगदाणा तेलाचा वाढला

शहरातील बाजारात शेंगदाणा तेलाचे दर प्रतिकिलो २० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. मागील दोन महिन्यांत शेंगदाणा तेलात सर्वाधिक वाढ झाली असून ग्राहकांना पर्यायी तेलांकडे वळावे लागत आहे.

### अनेक दिवस स्थिरतेनंतर तेल महागले

गेल्या अनेक महिन्यांपासून खाद्यतेलाचे दर जवळपास स्थिर होते. मात्र, जानेवारीपासून अचानक दरवाढीचा ट्रेंड सुरू झाला असून ही वाढ टप्याटप्याने होत आहे.

# अं. सुर्जी नगरपरिषदेची सत्तेची चाबी महिलां लोकप्रतिनिधीना

## नावापुरती महिला लोकप्रतिनिधींच्या कॅबिनवर अधिकाऱ्यांचा ताबा

**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.२७अंजनगाव सुर्जी** - महिलांना राजकारणात काम करण्याची संधी मिळावी,व समाजातील विविध घटकांमधील प्रश्न त्यांना समजावे, तसेच महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण शासनाकडून देण्यात आले आहे.

अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेची २८ सदस्य संख्या असून ५० टक्के नुसार नगरपरिषदेच्या सभागृहात १५ महिला पोहचल्या आहेत. त्यातील उपनगराध्यक्षापदी प्रियंका मालठाणे यांची वर्णी लागली आहे तर नियोजन व विकास समिती सभापती पदी सौ उज्वला कविटकर यांची वर्णी लागली आहे महिला बालकल्याण सभापती पदी सौ सुनिता बाळे तर उपसभापती पदी सौ नसिमाबी रहिमशहा यांची निवड करण्यात आली आहे. एकुणच अंजनगाव शहराचा कारभार नगरपरिषदेच्या सभागृहातून महिला सांभाळणार आहेत.

अं. सुर्जी नगरपरिषदेचे प्रथमच उपनगराध्यक्ष पद हे महिलेला मिळाले आहे तर सभागृहात १५ महिला पोहचल्या आहेत त्यामुळे उपनगराध्यक्षाना स्वातंत्र्य कॅबिन असणे आवश्यक होते मात्र तसे न करता अधिकाऱ्यांनी कॅबिन आपल्या ताब्यात घेऊन महिला लोकप्रतिनिधीना महत्व न दिल्याचे निर्दशनास येत असल्याने आता नवनिर्वाचित नगराध्यक्ष अविनाश गायगोले व उपनगराध्यक्षा प्रियंका मालठाणे कोणती भूमिका घेतात याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे

### प्रशासकीय कारभार चालते दोन इमारती कार्यालयातून

अंजनगाव सुर्जी नगरपरिषद मुख्य कार्यालय इमारत लहान असल्यामुळे बहुतांश महत्त्वाचे प्रमुख विभाग हे नगरपरिषद शाळेच्या इमारती कार्यालयातून चालते. मुख्य इमारती कार्यालयात




मुख्याधिकारी यांचे कार्यालय असणे गरजेचे आहे तर शाळेच्या इमारती कार्यालयात उपमुख्याधिकारी यांचे कार्यालय असणे गरजेचे होते ,कारण त्या इमारत कार्यालयात इतर महत्त्वाचे प्रमुख विभाग आहेत त्यामुळे प्रमुख विभागांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महत्वाच्या अधिकाऱ्यांचे कार्यालय असणे गरजेचे आहे. प्रशासकीय कारभार व्यवस्थित व नियंत्रणात आणण्यासाठी तसेच महिला लोकप्रतिनिधीना योग्य मानसन्मान देऊन आपला अधिकार मिळवून देण्यासाठी नवनिर्वाचित नगराध्यक्ष कोणती भूमिका घेतात याकडे महिला नगरसेविकांचे लक्ष लागले आहे.

**महिला नगरसेविकाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न**

२६ जानेवारी निमित्ताने नवनिर्वाचित सर्व महिला नगरसेविका नगरपरिषद कार्यालयात झेंडावंदन करण्यासाठी उपस्थित होत्या मात्र महिला नगरसेविकांना बसण्याची कोणतीही वेगळी व्यवस्था नसल्यामुळे महिला नगरसेविका आप आपल्या परीने जागा उपलब्ध असेल त्या ठिकाणचा साहारा घेत होत्या मात्र महिला नगरसेविका कडे नवनिर्वाचित सभागृहातील पुरुष सदस्यांसह प्रशासनाने कानाडोळा केला असल्याची महिला नगरसेविकांत दबक्या आवाजात चर्चा होत होती. हा प्रकार महिला नगरसेविकांचा सभागृहात आवाज दाबण्याचा प्रयत्न असू शकतो का ? असा प्रश्न आता महिला नगरसेविका उपस्थित करीत आहे-

# प्रजासत्ताक दिन संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ ठरला आकर्षण

## 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' संकल्पनेचा भव्य आविष्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७नवी दिल्ली**- संपूर्ण देशभरात सोमवारी ७७वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त कर्तव्य पथावर परेड सादर करण्यात आली होती. यामध्ये महाराष्ट्राच्या चित्ररथाचाही समावेश होता. दरम्यान, महाराष्ट्राच्या चित्ररथातून गणेशोत्सवाचे दर्शन दाखवण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा मानबिंदू असलेल्या गणेशोत्सवाचे भव्य दर्शन या चित्ररथातून घडवण्यात आले आहे. गणरायाची भक्ती, लोककला, परंपरा आणि सामाजिक संदेश यांचा सुंदर संगम यामध्ये पाहायला मिळतो. देशभरात महाराष्ट्राची ओळख निर्माण करणारा गणेशोत्सव हा केवळ सण नसून लोकभावना, एकतेचा संदेश आणि संस्कृतीचे प्रतीक आहे. या चित्ररथातून गणेशभक्तीची ऊर्जा आणि महाराष्ट्राची समृद्ध परंपरा प्रभावीपणे मांडण्यात आली आहे.


**महाराष्ट्राच्या चित्ररथाची वैशिष्ट्ये:**

संकल्पना: 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक

अष्टविनायकांचे दर्शन: महाराष्ट्रातील प्रसिद्ध अष्टविनायकांची मोहक प्रतिकृती

जिवंत दृश्य: ढोल-ताशा पथक, मूर्तिकार आणि विसर्जनासाठी निघालेले गणेशभक्त हे जिवंत देखावे चित्ररथाचे प्रमुख आकर्षण होते

सांस्कृतिक वारसा: चित्ररथाच्या माध्यमातून महाराष्ट्राची अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक सक्षमीकरणाची ओळख पटवून देण्यात आली.




कर्तव्यपथावर जेव्हा हा चित्ररथ आला, तेव्हा 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने वातावरण भारावून गेले होते. यावर्षी १७ राज्य आणि १३ मंत्रालयांच्या चित्ररथांपैकी महाराष्ट्राच्या चित्ररथाने विशेष कौतुक मिळवले आहे.

**ढोल-ताशांचा गजर, राजधानीत महाराष्ट्राची ऊर्जा**

चित्ररथासोबत ढोल-ताशा पथकांनी सादर केलेल्या स्फूर्तिदायक तालांनी कर्तव्य पथावरील वातावरण भारावून टाकले. मुंबई आणि पुण्याच्या सांस्कृतिक ऊर्जेचा ठसा थेट देशाच्या राजधानीत उमटताना पाहायला मिळाला.

प्रजासत्ताक दिन संचलनातील ठळक वैशिष्ट्ये

यंदाच्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात अनेक ऐतिहासिक घडामोडी साक्षीदार ठरल्या. युरोपियन युनियनचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला व्हॉन डेर लेयेन हे यंदाच्या संचलनाचे प्रमुख पाहुणे होते.

भारताच्या राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'च्या १५० व्या वर्धापनदिनानिमित्त विशेष सादरीकरण करण्यात आले. तसेच भारतीय लष्कराच्या सामर्थ्याचे दर्शन घडवणारी 'बॅटल अँरे' रचना आणि स्वदेशी संरक्षण क्षमतेचे प्रतीक असलेली दीर्घ पल्ल्याची हायपरसॉनिक क्षेपणास्त्रांचे प्रदर्शन हे संचलनाचे प्रमुख आकर्षण ठरले.याशिवाय गगनयान मोहिमेसाठी निवड झालेले ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांना अशोक चक्र प्रदान करण्यात आले. या सर्व बाबींमुळे ७७वे प्रजासत्ताक दिन संचलन अधिक भव्य, ऐतिहासिक आणि लक्षवेधी ठरले.प्रजासत्ताक दिनी सहभागी होणाऱ्या विविध राज्यांच्या या चित्ररथांमधून भारताची संस्कृती आणि प्रगती दाखवली जाते. देशातील विविध राज्ये, केंद्रशासित प्रदेश आणि मंत्रालयांमधून चित्ररथ निवडण्याची प्रक्रिया काही महिने आधीच सुरू होते. संरक्षण मंत्रालयाकडून अनेक फेऱ्यांच्या निवड प्रक्रियेनंतर हे चित्ररथ सादर केले जातात.



आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत